**प्रेसनोट** दिनांक 02/06/2018

## मोटार सायकल चोरटे स्थानिक गुन्हे शाखे कडून अटक

दिनांक 01.06.2018 रोजी संध्याकाळी सपोनि पी.डी. भारती स्था.गु.शा नांदेड यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, इसम नामे संतोष सुभाषसिंह ठाकुर, वय 21 वर्ष रा. विठलनगर, नांदेड हा गुन्हेगार वृत्तीचा असून त्याच्याकडे चोरीची हिरो होंडा स्पेंल्डर प्लस मोटार सायकल आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सपोनि पी.डी. भारती व स्टाफने सदर ठिकाणी जावून अंबेडकर भवन समोर ग्यानमाता शाळेच्या बाजूला नांदेड येथून त्यास मोटार सायकलसह ताब्यात घेवून विचारपूस करता त्याने सदर मोटार सायकल चोरल्याचे सांगितले. त्याचेकडून एक हिरो होंडा स्पेंल्डर प्लस मोटार सायकल क्र. एम.एच. 26. डब्ल्यू. 4209 किंमती अंदाजे 20,000 हजार रूपयाचे जप्त केली असून, त्यास जप्त मोटार सायकलसह पोलीस स्टेशन विमानतळ नांदेड येथे हजर केले.

तसेच गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती वरून संशईत आरोपी नामे उत्तम हिरासिंग पांडे वय 33 वर्ष (वॉचम्यान) रा. मगनपुरा नांदेड यास ताब्यात घेवून चोरलेल्या मोटार सायकल बाबत विचारपूस केली असता त्याने अंदाजे 02 महिन्यापूर्वी एक हिरो होंडा सी.डी. 100 चोरल्याचे सांगून सदर मोटार सायकल भंगारवाल्याला विकल्याचे सांगितले. त्यावरून संबंधित भंगारवाल्यांकडे विचारपूस करून सदर आरोपीकडून चोरीची हिरो होंडा सी.डी. 100 मोटार सायकल क्र. एम.एच. 26. सी. 3397 किंमती अंदाजे 20,000 रूपयाची जप्त करून सदर आरोपींना जप्त मुदेमालासह पो.स्टे. शिवाजीनगर नांदेड यांच्या स्वाधीन केले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री चंद्रकिशोर मीणा, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री मंगेश शिंदे, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र सहाणे स्था.गु.शा नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि पी.डी. भारती, पोहेकॉ/1070 कुलकर्णी, पोहेकॉ/65 जांबळीकर, पोहेकॉ/1450 केद्रे, पोना/2090 पांढरे, पोना/2458, राजू पांगरेकर, पोकॉ/2668 महेश बडगु, पोकॉ/ब्रम्हा लामतुरे, पोकॉ/103 बैयनवाड, पोकॉ/148 गंगुलवार, पोकॉ/152 परदेशी, पोकॉ/3063 बाबर, पोकॉ/3160 पवार यांनी पार पाडली आहे.

पोलीस अधिक्षक
नांदेड करिता